**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक :- २३४** **दिनांक :- २८/०८/२०२१**

**<u>भाजी मार्केट, भाईंदर पुर्व येथुन चोरीस गेलेल्या मुद्देमालासह ट्रक हस्तगत करून दोन आरोपी अटकेत- नवघर पोलीस स्टेशनची कामगिरी.</u>**

दिनांक २१/०८/२०२१ रोजी श्री. महेश बुधाजी पाटील, वय ४५ वर्षे, व्यवसाय-ट्रान्सपोर्ट, रा. विरार यांचे मालकीचा ०३,५०,०००/- रु. किं. चा टाटा कंपनीचा एलपी ट्रक क्र. एमएच-०४-सीए-८३९१ त्यामध्ये असलेला १०,००,०००/- रु. किं.चे स्टिल, ग्लास व वाटी असा एकुण १३,५०,०००/- रु. ची मालमत्ता असलेला ट्रक भाजी मार्केट, भाईंदर पुर्व येथुन चोरी झालेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ५८४/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे अज्ञात चोरटयाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर परिसरात वाहन चोरीचे गुन्हयांचे वाढते प्रमाण पाहता वरिष्ठांनी सदर गुन्हयाची लवकरात लवकर उकल होणेबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीदारामार्फत सदरचा गुन्हा करणारा आरोपीस रेतीबंदर, बांबुवाडी, माहिम मुंबई येथुन अटक केलेली आहे. तसेच अटक आरोपीने चोरी केलेला ट्रक व त्यामधील मालापैकी ७० गोणीमधील स्टिल ग्लास व वाटी असे माल हस्तगत केला. तसेच आरोपीने उर्वरीत १४ गोणीमधील स्टिल ग्लास व वाटी असा चोरीचा माल विकत घेणारा आरोपी भंगार दुकानदार यास माहिम, मुंबई येथुन अटक करुन त्याचेकडुन १४ गोणीमधील स्टिलचे ग्लास व वाटी असा गुन्हयातील चोरी झालेली १३,५०,०००/- रु. ची संपुर्ण मालमत्ता हस्तगत केलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा. पो. आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२९५६ ऐनोदीन शेख, पोशि/३४५८ संदिप जाधव, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/०५०८९२ अमित पाटील यांनी केली आहे.

-------------ooooo-------------